म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७३०
२-१-१९६९
REFBK-0014828
REFBK-0014828

# रूपरेखा

गोविन्द जोशी

रु. ३·००

REFBK-0014828

REFBK-0014828

व्हीनस प्रकाशन : पुणे

आवृत्ती पहिली
डिसेंबर १९६५

*

© प्रा. गोविंद रामचंद्र जोशी

*

चित्रकार : अनंत सालकर

*

प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
" तपश्चर्या "
३८१ क, शनवार पेठ : पुणे २

*

मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनवार पेठ : पुणे २

या संग्रहात–

जवळ जवळ तीस कविता
'मनोहर', 'केसरी', 'साधना', 'सह्याद्रि',
'मराठवाडा', 'प्रतिष्ठान', 'युगवाणी',
'वाङ्मयशोभा', 'नवे जग', 'सुदर्शन', आणि–
'दिलिग्डोनियन' या नियतकालिकांतून
प्रकाशित झाल्या आहेत.

काही कविता
पुणे व मुंबई आकाशवाणीवरून मी वाचल्या आहेत.
संबंधितांच्या "सौजन्याने" त्या
या संग्रहात घेतल्या आहेत.

या संग्रहाला
पद्मश्री प्रा. अनंत काणेकर
यांनी चार शब्द लिहिले
आणि
व्हीनसचे श्री. स. कृ. पाध्ये
प्रकाशक म्हणून लाभले.

या सर्वांचा मी आभारी आहे.

**गोविन्द जोशी**

४९२, मारवाड पेठ
पांजरपोळनजीक
सांगली

प्रा. गोविन्द जोशी यांचे
प्रकाशित साहित्य

" गंधरात्र " ( कविता संग्रह ) : १९६२

* * * * *

आगामी प्रकाशने

| | |
|---|---|
| स्वप्नशृंगार | कविता संग्रह |
| विरहमंदिर | कविता संग्रह |
| स्मरसरिता | खण्ड काव्य |

रूपरेखा

माझ्या "गंधरात्र" या पहिल्या कवितासंग्रहाच्या लेखनकालात लिहिलेल्या या काही कविता

अनुभवाच्या एकाकी मार्गावरून वेगावत असताना, शब्दरूप होणारे उद्‌गार पुढील मार्ग अंशतः दृश्यमान करीत, मला पुढे नेत आहेत. ही वाटचाल, आज इथवर आली की, हिचा प्रारंभ आज आठवणींच्याही कक्षेत राहिलेला नाही

ज्या वेळी उद्गार उमटू शकत नाहीत आणि पुढील मार्गही अदृश्य असतो, त्या वेळी मी तिथेच अडखळून रहातो, थांबून मागे पहातो; पण माझ्या पायखुणाही केव्हाच नाहीशा झालेल्या असतात आणि काहीसा विलक्षण रितेपणा मला घेरून रहात आहे, असे वाटू लागते

अशा वेळी, या "रूपरेखा" नक्षत्रासारख्या मला समूर्त होतात व माझा रितेपणा एकाएकी भरून येत रहातो. सोबतीचा क्षणमात्र दिलासा लाभू लागतो. अज्ञाताचे वेध आणखी तीव्र होतात व आणखी एक उद्गार पुढील मजल उजळून जातो—

त्या या रूपरेखा

माझ्या भावजीवनातली ही विश्रांतिस्थाने आहेत

**गोविन्द जोशी**

# मला काय वाटते ते—

"रूपरेखा" या आपल्या कवितासंग्रहाला चार प्रास्ताविक शब्द लिहा असे कवी श्री. गोविंद जोशी यांनी मला सांगितले, तेव्हा आधुनिक कवितेला प्रस्तावना शोभत नाही, तिला प्रस्तावनेची मुळीच आवश्यकता नसते असे त्यांना मी सांगितले. तरीही तुम्हांला या कवितांसंबंधी काय वाटते ते तुम्ही लिहा असा आग्रह त्यांनी केला त्याप्रमाणे मला काय वाटते ते मी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

प्रस्तावनेची आवश्यकता नसते, ती आधुनिक कवितेला शोभत नाही, असे म्हणावयाचे कारण, आधुनिक कविता अधिकात अधिक शुद्ध, अधिक निर्भेळ काव्य आणि कमीत कमी सामाजिक प्रचार, राजकीय मते किंवा आध्यात्मिक उपदेश देण्याचा प्रयत्न करते; शब्दांतल्या अर्थांच्या पलीकडे असलेली सूक्ष्म गूढ अशी जी शुद्ध काव्य नावाची काही वस्तू आहे, ती पकडण्याचा प्रयत्न करते.

शुद्ध काव्यच देते असे मी म्हणत नाही. कारण तसा कितीही प्रयत्न केला तरी भाषा किंवा शब्द ही गोष्टच अशी आहे की, समाजजीवनातून ती निर्माण झालेली असल्यामुळे, उपरोक्त उल्लेखिलेल्या काव्यबाह्य गोष्टी, कवितेला साफ टाळताच येणार नाहीत. कमीत कमी अर्थ

आणि अधिकात अधिक अर्थापलिकडले काव्य. असा प्रयत्न करता करता, अर्थ साफच उडवून दिल्यास, केवळ स्वर असलेले संगीत निर्माण होईल.

सांगण्याचा मुद्दा इतकाच की, आधुनिक कवितेत, प्रस्तावनेने चर्चा करण्यासारखे असे काही नसते. असते ते कवीच्या मनाने निर्मिलेले, सरळ रसिकाच्या मनाला जाऊन झोंबणारे. "अर्थाआधी झोंबिजे प्रमेयासी" असे काही ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, ते हेच नसेल ना?

अर्थाआधी रसिकाच्या मनाला झोंबणारे काव्य "रूपरेखे"त अनेक ठिकाणी आहे. याच कारणाने तुमची कविता मला आवडली असे मी श्री. गोविंद जोशी यांना म्हटले.

'छिनाल' कवितेत—

*'काळोखाचा अथांग सागर*
*वारा विणतो काळे रेशिम*
*सळसळणाऱ्या फांद्या करती*
*सुस्काऱ्यांची बेचव तालिम...*

*थबके वारा रेशिम विणता*
*सळसळ होते अमळ संचित,*
*एकांतातुन हळूच निसटे—*
*चिवचिव नि फडफडाट, उत्तर'*

या ठिकाणी किंवा 'आणिक जळतो पारिजात' या कवितेत--

*'आणिक जळतो पारिजात नित...'*

*'हसती त्याला झाडे, झुडुपे*
*पाहुन वेली वळवित माना*
*आणि काढते कुणी साळुंकी—*
*म्हाताऱ्या चिंचेवर ताना'*

या ठिकाणी, आणि अशा अनेक ठिकाणी 'रूपरेखे'तले काव्य मला जाणवले.

अनेकांना, अनेक ठिकाणी ते जाणवेल, याची मला खात्री वाटते.

अनंत काणेकर

——— काव्यलेखनाचे मार्गदर्शक तीर्थस्वरूप कवी गिरीश यांस

# अ नु क्र म

मृगजळातली ही पदचिन्हे १७, आपरूप १९, मृगजळाची तू मुग्ध देवता २०, सागरतीरी २३, ओले चांदणे २५, धीट २६, मूक पाखरे २७, फूलखुळी २८, लिली २९, सुखवंती ३०, वसंताच्या वाटिकेत ३३, पुष्पप्रश्न ३४, ज्वाला ३६, निळी आग ३८, या ज्वालेचे एकुलतेपण ३९, चंद्रफूल ४०, दिन सांजावला ४१, रूपरेखा ४२, जाइजुईच्या कुशीत ४४, वडवानल ४५, स्मरविद्धा ४६, सावल्याहि लांबल्या ४७, काळेभोर डोळे ४८, वाहतो वेडा वारा ४९, आकाशाच्या निळ्यावर ५०, श्रावण-संध्या ५१, मोद-मंदार ५२, घन आषाढ गहन ५४, लाडली ५५, वेध-चांदणी ५६, मृडानी ५७, अश्विनी ५८, मीलनोदय ५९,

चंद्ररेखा ६०, स्पर्शलिपी ६१, रात उन्मत सुरंग ६२, चंद्रधनु ६३, शरद-यौवना ६४, लाज उमटली ६५, हरव ६६, उदासी ६७, हाक ६८, जळवेडी ७०, वसंत-वणवा ७१, तो चाफा : ती सकाळ ७२, एकएकला निःश्वास ७४, शेषयामा ७५, सुमित्रा : एक अशक्यता ७६, प्रश्नबाह ७७, रातराणी ७८, परावा ७९, पेंग ८०, अंधार ८१, लाव ८२, छिनाल ८३, विझलेला रत्नदीप ८४, उंबरा ८५, आकसली घट्ट माती ८६, बकुल-रात्र ८७, एकाकिनी ८८, चिरचैत्र ९०, आणिक जळतो पारिजात ९१, व्याकूळ पाणी ९२, वाटचाल ९४, अरण्यरुदन ९५, महाप्रयाण ९६, कवडसा ९७, झाड ९८, माणसं १००, जळवेडा १०१, काललीला १०२.

## जेव्हा दुःख सह्य होऊ लागतं...

जेव्हा दुःख सह्य होऊ लागतं—
तेव्हा शब्द कण्हू लागतात

पोटाशी घेऊन पडल्यासारखी
निपचित शांतता
नाकारू लागते हुंदक्यांची नकोशी लगट,
मोठ्या शरमेनं आवरून धरलेले निःश्वास
नेसतानाचं गळून पडल्यासारखे
एकदम सुटत असतात,
अवचित भरून आलेल्या गात्रांसारखी
वेदना तटतटू लागते
आणि थडथडणारे रोमांच–सारंच रान पेटवू लागतात

जेव्हा दुःख सह्य होऊ लागतं—
तेव्हा शब्द कण्हू लागतात...

## रूपरेखा

*...when and where*
*the dreams i share*
*they turned into facts*
*the undone acts*

*the forms and figures–*
*overflow my verse*
*i soak, i drench–*
*and meet my search*

## मृगजळातली ही पदचिन्हें

मृगजळातली ही पदचिन्हे
कुणी धावला वेडा मागे,
अजुनी रुतती या रेतीला
उष्ण वात भणभणुनी सांगे

पिसले यौवन पिचता अंतर
ऊर फुटे, ठिबठिबके लाली,
रुधिर सांडता कुठे थेंबभर
पदचिन्हा सौभाग्या ल्याली

महाभयंकर धाव पाहता
दिनरातींना येई भोवळ,
तप्त भाल, ओठावर थबके—
भग्न अश्रुचा सुकता ओघळ

क्षिति न पदांना या दुःखाची
रौरवही ओलांडून जाती,
कधी न तिमिरही झाकू शकला
नेत्रांतिल धगधगत्या ज्योति

कुशीत घे नियति ही ज्वाला
कालपंख पसरून रणावर,
कधि बुजवी, कधि उजवी वारा
पदचिन्हांचे ईप्सित, अंतर

मृगजळातली ही पदचिन्हे
कुणी धावला वेडा मागे,
विजन हो सखा, धावू बघतो—
धगयात्रेच्या मागे मागे

## आपरूप

हसू आसू फिके
लाजरे माणिक
धिटाईचे सुख

नितळ आवाज
मौनही बोलके
पापणीचे धुके

गालावर खळी
जराशी उकळी
थरारते कळी

आठवे नाठवे –
यातच वावरे
सावरे, नावरे

# मृगजळाची तू मुग्ध देवता

आर्द्र उरातून—
मुक्त उधळत भावांची दौलत
लाटांचा पर्वत फुटत आहे.
हेलावे अंतर वादळवेगाने
उंच उसळत आतून उर्मि—
—कारंज्यापरी
आणि चुंबून चंद्र, ताऱ्यांना
क्षणी कोसळती पुन्हा अवकाशी,
हिमकणांची जणु पखरण
—नाजुक, सुखद

तुझ्या दर्शनाने
वेडावलेला हृदयोत्सव
दिनरातीचे न ज्याला बंधन
ज्यांनी पुसली मृगजळाच्या
—तीरावरची
स्वप्नसत्याची सीमारेषा
हुरहुरीच्या वेड्या ओठांनी.

मृगजळ–स्वप्निल, शीतळ
ज्याच्या वायवी लहरीवरून

लोळलोळत विहार चाले
—तुझा अनघेचा.
सांद्र सुगंधित निःश्वसितांना
—तुझ्या
कुरवाळीत कुशीत आपुल्या
तेजाचे तलम वसन झळाळे
...साथ देत मुक्त कृष्ण कुंतलांना
...आणि वितरीत—
गंधलहरी फेनफुलांच्या,
ज्यांच्या घोसांनी सजतो तुझा
—कचसंभार

गौर कातीव बाहुद्वयांनी
निवारू पाहसी—
दाटले धुके, वेड्या बेहोषीचे
जणु लाटांची लाडिक खट्याळी
मृगजळावर

मनोगतांच्या नौकेवरूनी तुझ्या
झेपावत येई नील प्रकाश
बावऱ्या धुक्याने फिकुटलेला.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 78826

मृगजळाची तू मुग्ध देवता
नेत्रांतून तुझ्या बोलू पाहते
व्याकूळ हाक.
पालवते कर खेचू पाहती
तीरावरच्या मुशाफिराची
—दिवाणी दुनिया

तिथे उभा मी
प्रकाश-गीते झेलित, सांडत
परी खिळलेला जड पावली
दीपगृहापरी—
धरेत रुतल्या

# सागरतीरी

चैत्र-वैशाखाची पिवळी दुपार
अजून जळते उरली आग
सागरतीरी.

अंगाअंगावर
फुटते लाही हळव्या वाळूच्या
शोधीत जीवन चम्‌चमे रेतीत
—व्याकूळ तलखली.
तप्त सागराचे उमाळे उसासे
पिऊन आपुला शमवी दाह
खाऱ्या जीवनाने

पेटला सागर
भाजते क्षितिज वाफांच्या लोटांनी
खालून वरून अंतर जाळत

सागरकाठी
जमल्या साऱ्या रिकाम्या नारळी
एखादी त्यातली—
ओणवी होऊन वाकून पाहते
मिस्कीलपणे, पेटत्या जळी.
झावळबोटे ओठाशी आणत

आणि लपवीत अमृतकुंभ,
उगाच करी जड पापण्यांची
—उघड-झाक.
फिरवी डोळे मलूल करीत
आणिक टाकते उसना उसासा
— 'पोळत्या उन्हाचा'

संतापे सागर, जळ्फळे रेती
आणि निखळती हशाच्या लहरी
दाट बनातून

# ओले चांदणे

अवचित वाऱ्यापरी येसी हळूच कुठून
तुझ्या अंतराचा गंध राही मजला वेढून

जाता जाता ठिबकते स्मित अधराचे कोनी
भोळ्या नेत्रांनाही साधे भावमधुर शिंपणी

ओझरती लाज फुले, गाली खळी फुटे गोड
ओसंडल्या आनंदाला मान घालते मुरड

वेण्या तिपेडी लोळती कधी पुढे, कधी मागे
अजमावीत रूपाला कुठे विणती का धागे ?

कानांतल्या मोत्यापरी रोज धवल वसन
हेलकावे त्यात तुझे गौर गुलाबी यौवन

कधी अल्लड पाखरू, कधी होसी रडवेली
कधी मुग्धतेतही तू उटी जिवाला लावली

ओले चांदणे शिंपत वावरसी तू लहरी
मागू कशाला मी प्रीती ? छे, ते अमृत जहरी

## धीट

काही नसता संकेत तुझी माझी झाली भेट
परी निघून तू जाता रेंगाळली माझी वाट

काही बोललो मोजके, थबकलो काही क्षण
उमगले सारे काही, नुमगावे तेही पण

कुठे लागता चाहूल, तुझे लाजले कपोल
फुलणाऱ्या चांदण्याने तुझे नयन विलोल

बावरल्या तुझ्या ओठी काही उमटे कातर
नादवून अंगअंग मंजुळले ग अंतर

विसरलो क्षणी मला, झालो कशाच्या स्वाधीन—
नकळत दिला तुला जाता निरोप येथून

पाहिलेस वळून तू, मीही पाहिले वळून
दिसेनाशी होता होता तुझे हसले लोचन

तुझी माझी न ओळख परी भारीच तू धीट--
भाव तुझे डोळ्यांतले बिलगती मला थेट

# मूक पाखरे

मी स्पर्शाला नव्हतो आसुसलेलो
मज हवि होती ती
हवी नकोशी जळती चाहूल
आतून हळहळणारी,
अन् चुरचुरणारा चटका–
तो मागत होतो
न्यहाळताना तुजला–
पदमस्तक फुललेली

पण तुला वाटले
तुझ्याच मनचा राहू गिळून टाकील
तो, तो नव्हतो मी
मी नव्हतो स्पर्शासाठी आसुसलेलो

टक लावून बघता
लव थबकून क्षणभर—
काढत फणा अनोखीपणाचा,
झटकून गेलिस सांडत मागे
सळसळणारा लालपणा
पण उरली अजुनी
घोटाळत मजभवती ती
मूक पाखरे—
नयनकडांतून जाताना फडफडली

" अे- " क्षणिक थरथरता
भाव उभा पापणीत,
धडधडते ऊर तुझे
घुसमटते आत गीत

" ही माझी " हातातुन
व्याकुळलेली कविता—
पदमस्तक मोहरली
आसुसली एक स्मिता

सुकलेले दोन ओठ
जमले दव टिपु बघती,
बोलांतून मुक्त होत
मौनाच्या मधुगीती

पेटत ये शब्द शब्द
धगधगत्या ओठांतुन,
फुलताना व्याकुळते
कलिकेचे मिटतेपण

## लिली

स्वच्छ शुभ्र गौर कांति
सोनकेशरी पराग,
कुण्या अनघेच्या ओठी
उमले हा अनुराग
ऋजु इवल्या पाकळ्या
जणु पंख पसरले,
कुण्या शापित परीचे
भाव दैवी अधीरले
तुम्ही लिलीच्या फुलांनो--
नित हसू ओसंडता,
भाव कोवळे शिंपता
माझी अस्मिता पोसता
निष्कलंक धवलता
चंद्र तुम्हांपुढे फिका,
आज स्मृतीतही फुले
शुभ्र चांदण्याची राका,
तुम्ही लिलीच्या फुलांनो--
धुंद धवल आनंद,
मला घ्याल ताटव्यात ?
मीही विरेन निवांत

राधा मधुरा, मोहन-बधिरा
ही गोरी, हिम-शीतल, मसृण
कंठात हिच्या मदिर बासरी
गात्रात हिच्या यमुना भरली
तुडुंब, दाटून

टक लावून आकंठ पिताना
ही न सावरे
घुसमटणारा पदर उरीचा,
ही न थरथरे जरी बहरली
अंगांगावर आरक्तानी,
ओठांशीही ओठ भिडवता—
ही न कचरते,
सोनझळांनी सरळ झाकते
मिठीत मोहरलेला मोहन

हिला न लागे कातर संध्या
भर दुपारच्या लख्ख उजेडी
हीच घालते उघडी कोडी—
अवचित एकांताला.
वसंतातल्या पर्णफुलापरी

—सळसळते,
खळखळते—
वर्षेचा होउन ओहळ
हेमंताच्या श्रीमंतीने
ही हेलावत असते
सुखवंती—
मान विसावुन खांद्यावरती

मार्गशीर्ष पौषाच्या प्रहरी
हीच एकटी—
गालावरती माळत असते
आठवणींचा सोनसोलिया.
वक्षावरती लोळत असतो
श्याम सकुंतल
लाडिक अवखळ पुढ्यात येउन.
ओठावरती रंगत असते
दरवळती स्वरगंधा,
साहत असते ताप उन्हाचा
मोहन उटीने थंड दाहत्या
—तनामनाचा

ही राधा
ही गोड उबेची धारा
ही मद-अवजड होते-
माथ्यावर नभ घेते,
गौर नासिका
अधिकचि रेखिव दिसते.
थकल्या, सुख-दुखल्या गात्रावर
पदर सैलसा, ऐलपैलसा
आणि उरी कळ—
अमृत जहरी, दाहक, मादक

## वसंताच्या वाटिकेत

वसंताच्या वाटिकेत रोमांचांना ये बहर
अंगाअंगावर उते वेड्या प्रीतीचे जहर

सृष्टि संकोचू पाहते सावरून उभे वेड
परी आवरेना तिला सुगंधाची जन्मखोड

वाऱ्यावरचे प्रवासी फांदीवर जमा झाले
पंखांचोचींमध्ये त्यांच्या ओझे सुखाचे सरले

सृष्टि नाकारू पाहते समीराच्या सोनझळा
जवळिक जड करी साऱ्या समृद्धीच्या कळा

तिचा नकारही झेले पाण्यावरली झळाळी
माथ्यावर ओढलेली तिने चांदण्याची जाळी

गर्द सावल्यांना ठसे रंगारूपाचे गोंदणे
सारे रानभर होई ओल्या मेंदीचे चांदणे

## पुष्पप्रश्न

फुलल्या होत्या लाख कळ्या
अन फुलली होती रातचांदणी,
निथळत होते स्वप्न मुलायम
झेलित मधुची सुखद शिंपणी
प्राशिल्यास तू असल्या घटका—
धुंद तरळते अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

झुरले तारे पाहिलेस तू
रातराणिच्या भुलावणीला,
धुंद घातली साद वायुने
मोहरलेल्या कुण्या जाइला
पाहिलेस तू असले कूजन—
बावरसी तू अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

उसळत होते गहिरे गहिरे
नीरवतेच्या त्या काठावर,
खुणवत होते आणि उफाळुन
करावया भलतेच अनावर
चाखलीस तू असली मदिरा

लहरे लाली अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

मनि भलते का आज मोहिनी ?
अजुन तरळते धुंद विलासी,
या जादूने कदंब फुलवत
नको खुळावुस कुणी प्रवासी
सलगीचे तुज सारे असले
मजसाठी तुज कणव नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

आणि तरीही आज असे का ?

## पुष्पप्रश्न

फुलल्या होत्या लाख कळ्या
अन फुलली होती रातचांदणी,
निथळत होते स्वप्न मुलायम
झेलित मधुची सुखद शिंपणी
प्राशिल्यास तू असल्या घटका—
धुंद तरळते अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

झुरले तारे पाहिलेस तू
रातराणिच्या भुलावणीला,
धुंद घातली साद वायुने
मोहरलेल्या कुण्या जाइला
पाहिलेस तू असले कूजन—
बावरसी तू अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

उसळत होते गहिरे गहिरे
नीरवतेच्या त्या काठावर,
खुणवत होते आणि उफाळुन
करावया भलतेच अनावर
चाखलीस तू असली मदिरा

लहरे लाली अजुन, नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

मनि भलते का आज मोहिनी ?
अजुन तरळते धुंद विलासी,
या जादूने कदंब फुलवत
नको खुळावुस कुणी प्रवासी
सलगीचे तुज सारे असले
मजसाठी तुज कणव नाही का ?
आणि तरीही आज असे का ?

आणि तरीही आज असे का ?

## ज्वाला

तू इंद्रधनूची ज्वाला
अति नितळनितळ तव कांति,
हे अग्निकण अन संतत
गात्रागात्रांतुन फुलती

कधि मुग्ध निरागस होसी
कधि वीज लकाकुन नाचे,
व्याकूळ कधी मज करिसी—
घेऊन रूप विकलेचे

हे तेज तुझ्या गात्रांचे
वसनात लपेटुन घेसी,
परि खुळवी तेहि फिकुटले—
हिम-अंगाराची राशी

तू इंद्रधनूची ज्वाला
होताच तुझे दर्शन,
त्या सप्तरंगी दुनियेचे
हो इथे मूर्त नर्तन

रुणझुणत भाव नुपुरे
स्मित, कटाक्ष उधळी फुले,
गात्रांतून रसरंगाची
ये लाट, चिंब मी, फुले

तू इंद्रधनुची ज्वाला
जळते हे आकर्षण
ही गात्रे, मन दरवळते
होण्यास तिथे इंधन

# निळी आग

भासातही नाचते चित्त माझे
नामास ओठी फुटे मोहर
साधी अपेक्षा तुझ्या दर्शनाची—
गात्रांत पेरी भुरे काहुर

होई धुक्यासारखा जीव वेडा
वेधात डोळे तुझ्या धावती,
झाले तुझे लक्ष्य जेव्हा कळे मी—
पेटे निळी आग पाण्यावरी

# या ज्वालेचे एकुलतेपण

या ज्वालेचे एकुलतेपण
तेच जळतसे जळण्यासाठी,
तेजाच्या व्याकूळ शलाका
तेवत विरती तेजापाठी

स्फुलिंगांना गिळीत सरती
त्या तेजाचे अविरत कण कण,
आणि अनंता बिलगू बघते
ते अक्षय अगतिक जळतेपण

## चंद्रफूल

चंद्र-फूल उमलता
बिसतंतू होई गळ,
खोल रुतलेली कळ

जन्ममृत्यूंच्या वेशींनी
खुली अवघ्यांना वाट,
बंद परी माझी दिठ

अंध वणव्यांनी माझी
धडधडती अस्मिता,
जळण्याने रिता माथा

स्थिर तेवणारी धग
कोंदलेली जीवनता—
विना जगता, मरता

## दिन सांजावला

दिन सांजावला, दाटते काहूर
प्रकाश ना तम, वाढे हुरहूर

एकले सदन उजळत दीप
थरारे अंतर सुदूर समीप

पथी मालवली चाहूल वर्दळ
आकाशी लागली अंधळ्यांची माळ

प्रतीक्षा नेत्रांत थकते, थकते
आतुरले मन धावते, धावते

अंतरी कालवे जाईचा सुगंध
आता मात्र फुटे संयमाचा बांध

मूक भावभरे नेत्र वाहताती
आणि सुखविती विरहाच्या गीती

विरहाच्या गीती नाशती विरह
आणि उजळती व्याकुळले भाव

मनी काहुरले नेत्री जमे रूप
गीतातले येई सन्निध, समीप

## रूपरेखा

दिसशी जेव्हा, कुठे कसाही
क्षणात झरते धुके गुलाबी–
गुबगुबीतसे
आणि सशासम गुदमरते रे.
निःश्वासही तो होतो अवजड
ज्यावर मी रेलून टाकते भार
हृदी उठल्या उर्मींचा

उगिच झिरपते
गार चांदणे अंगांगातून,
मनी तारकांची हो चमचम
लकलकणारी, झरणारी.
शहारती उरी सहस्ररेणू
हिंदकाळतो गंध आतला
मोहक, कोमल

तू जासी—
श्रावणातल्या पावसापरी
लहरी
माझ्या नेत्री पेरून
सोनकोवळ्या सरी उन्हाच्या
मज कळते रे मी ओली, भिजलेली

संकोचुन सावरू पाहते
भाव उरीचा, ठिबकठिबकता
व्याकुळ, थरथरणारा

—नसतोस तिथे तू
जातो क्षण आलेला निघुनी
तुझ्या-तुझ्यासम
अर्धओली मी ठिबकत असते
एकएकली, आवेगाने
अधांतरी, इंद्रधनु होउन...

# जाइजुईच्या कुशीत

जाइजुईच्या कुशीत शिवेवर माझे घर
तुझा आठव वाढवी एकलीची हुरहूर

भाववेडे तुझे रूप, नसे कशाचाही ताठा
अहंतेने धावणाऱ्या ठाव नाही तुला वाटा

रोज जासी या वाटेने एकटाच दूरदूर
असो पुनव अवस, तुझा बदले न नूर

साधासुधा वेष शोभे, चाल भासे मंद जरा
सदा नजरेत वाहे भावजीवनाचा झरा

कुणी भेटला वाटेने ओळखीचा, हसे क्षण
क्षण थांबून वाटेत कुठे भिडवी लोचन

विचारात पुन्हा दंग, हळूहळू चालू लागे
मनाशीच जुळवीत क्षण तुटलेले धागे

कललेली मान जरा, तसे भारावले मन
दुरावल्या देवतेचे मनी करी का पूजन ?

रोज रोज सांजवेळी गावाकडेच्या पुलाशी
बसूनी हा काहीसेसे न्यहाळतो अवकाशी

अनामिका, अकारण तुझी लागली रे ओढ
आकारते तुला मनी, पाहते मी होते मूढ

# वडवानल

वडवानल ये लोळत लोळत
हरित तृणांच्या भूमीवरती
आणि करपती कळया कोवळया
पर्णफुले कळवळुनी जळती

वृक्षांमधुनी चाटू बघती
हजार जिह्वा आकाशाला,
धडधडती पेटून जीवने
रक्त उकळते दहा दिशांना

ही दाहक भयकर ये ज्वाला
कुरवाळित करी खाक अस्मिता,
घरटे होते राख जिवासह
परि न हिची वठते मोहकता.

विसरू म्हणते धुके, परंतु—
गुरफटते अन् त्यातच मी ग
लाख चांदण्या माझ्याभवती
चमचम माझ्या गात्रांवर ग
आणि तरळते त्या दर्यांवर
परी न भिजते तिळभर देही,
स्पर्श मुलायम होता, विरते
उरते होउन केवळ उर्मी
धावधावते वेडी होउन
जिथे उमटते माझे पाउल
दिसते माझ्यामागे फुलली—
मला घेरण्या त्याची चाहूल
त्या भावातुन भिजून थकता
सरते त्याची गहिरी छाया
परि त्याच्या नवलाख स्मृतींनी--
झंकारत दरवळते काया
धुंद लपेटुन माझ्याभवती
झाकू बघते त्याचे स्पंदन,
कधि जमते ग तो नसताना
दिसता जळते अनंग होउन

# सावल्याही लांबल्या

सावल्याही लांबल्या, शांत जाहली धरा
क्लांत जीव चालले आपआपल्या घरा

दिनमणी हा चालला घाइघाइने कुठे ?
हृदयशून्य पावले टाकतो पुढे पुढे

बावरे वसुंधरा खिन्न हो उदास अन
का मनास जाळते शून्यता रवीविण ?

एकदाहि पाहिना वळून तो धरेकडे ?
सोडुनी स्वये तिला चालला कुणीकडे ?

आग एकलेपणातली, या कठीण यातना
जाणतील का कधी पुरूष मूक भावना ?

आणि मी अशी इथे एकली तुझ्याविना
आठवी पुनःपुन्हा अंतरातल्या खुणा

आवरी मनास मी, फोल हीच वल्गना
नच अनन्य चेतना जीवना तुझ्याविना

शून्यता बळावली, अंधःकार मातला
लोचने खुळावली पाहण्या पुन्हा तुला

होउनी प्रकाश ये, सावली मी होइन
कर करात घेऊ, ये, जाउ ये तमातुन

## काळेभोर डोळे

काळेभोर डोळे दोन, पापण्या कातर
आसू ठरू पाहताती, उसासे अंतर

व्याकुळता घेरू पाहे अंतराचा साज
एकुलती अनावर ओसंडते लाज

डोळ्यातुन झेपावती वेडावले प्राण
कसा यावा हाती आधी सुटलेला बाण?

धरू पाहे जीव परी जागीच खिळून
झेप त्याची साहवेना आवंढे गिळून

वेधवेड्या नेत्री फुटे दबलेली हाक—
मोहरला कदंब हा मुशाफिरा झाक

# वाहतो वेडा वारा

वाहतो वेडा वारा
व्याकुळली रे कळी,
थरारे वादळात
पाकळी नि पाकळी

स्वप्नीही नव्हते रे
होईल काही असे,
पिसती वाऱ्यामधे
उमाळे नि उसासे

पोळतो माझा ऊर
सोसवेना हा कंप,
आकाश फाटेना रे
होईना धरा भंग

इवल्या देही घाली
ही वेदना थैमान,
पेटतो, फुलतो रे
अंगात कण कण

४

# आकाशाच्या निळ्यावर

आकाशाच्या निळयावर
झुबक्यांची हिरवळ,
रित्या मातीला लागते
आणि अंकुराची कळ
क्षितिजाच्या कोनातून
फुलू पाहतात वारे,
रानभर पसरते
सारे कावरेबावरे
खोडांतून पिंगा घेत
झीट फुटलेली झाडे,
कधी नव्हते ते असे
सुटू पाहे प्राण-कोडे
स्तब्ध पाण्यावरतीही
वारा शीळ घालू लागे,
अवघडलेली राई
निवाऱ्याची भीक मागे
रिती माती धाव घेई
आकाशाच्या कुशीसाठी,
क्षितिजांनी थरकापे
आसमंत आसूंसाठी

## श्रावण-संध्या

डोळ्यांत तुझ्या श्रावण-संध्या
गालांवर पश्चिम गुदमरली,
कच श्यामल अवखळ भाळावर
ओठांत कळी लव उलगडली

डोळ्यांत झरे श्रावण-वर्षा
ते ओले ऊन उरात तुझ्या.
कधी मिटत पापण्या सावरशी
रोमांच-झडी तू घमघमत्या

सुख-श्यामल घन माझ्या माथी
नभनील बिलगते मौन तुझे,
थरथरते अंतर, अंतर नच
युगविरही तृष्णा पाझरते

या मिठीत सामावू बघसी
डोळ्यांत मुखावर व्याकुळता,
मातीत आपुल्या सोनकळा—
विरली स्वप्नांची परवशता

# मोद-मंदार

आज दिवस तुझा आहे

प्रतीक्षेच्या पापणीत जपून ठेवलेल्या
मीलनाच्या रात्री
संतापाच्या अंगारात नको उजेडात आणूस,
नको घालूस निश्चयाचे घाव—
कटाक्षांच्या घणांनी,
उरात जोजवलेला आरक्त रक्तिमा
काजळत आहे कृष्ण उसाशांनी
आणि पाशेशी प्रीती
दवण्यापूर्वीच हरवत आहे तिचं कुंवारपण
जळून जात

नाही थांबवता येणार
ओणवलेलं थरथरतं आषाढ-आकाश
जुळून येत असलेला साज
मौनानं विस्कटून,
नको एकटी एकटी होऊस भरतीला संकोचून

पदमस्तक आकांत घालत झडणारे रोमांच-वारे
पापण्यांच्या काठाशी , ओठाशी
वेगावणारी पाणथरथर—

धावभुरी झालेली,
अवखळ बटांचे पाश निस्तेज, उदासीन
नको अनोळखी होऊस अंतरीच्या उधाणास

आरक्ताच्या भरतीत पराजित होत असलेला
हटवादी परावा,
पदराशी झट घेणारी ऊरभरती
किती सावरशील ? किती आवरशील—
ही पाठशिवणी, स्वतःशीच !
नको उसन्या धाकानं कोमेजवूस
उमलणारी स्मितं

एका निःश्वासासाठी तग धरून राहिलेला
चिणून गेलेला संकोच–सौध
अहं–स्तूपाशी धक्के घेणारे आनंद आवेग
हवी नकोशी, आकंठ गिळणारी मदनमिठी–
अटळ आहे मालवणाऱ्या तारकांची ताटातूट

विजेसारखी घुसत ये दर्या-ऊर धन्य करीत—
वाऱ्यावरती निवांत निरवीत प्रकाश-शलाका
——आपाद-मस्तक अस्वस्थ करणाऱ्या

## घन आषाढ गहन

घन आषाढ गहन
गर्द गहिरे गगन
ओली दवलेली धरा
श्याम सजल मोहन

थंड गोरटेसे वारे
तेज दीपलेले तारे,
झाडापानांत कातर-
दिठी भिजली पाखरे

भुरा गारवा उरात
धुके भरले कोनात,
पाझरती पाणलोट
अविश्रांत, अविरत

## लाडली

राया, हसलास का रे – तुला रुसायचे होते?
राया, फुललास का रे – तुला सुकायचे होते?

बोलाफुलाच्या काळात दिस कितीक सरले
किती गहिऱ्या मौनात भाव उदंड भरले!

इतराजी का रे राया – आज हसत नाहीस?
तुझ्या लाडलीला का रे, का रे दिसत नाहीस?

मान वळवून राया जासी निघून तडक
नको झाले का रे तुला माझे सुकलेले मुख?

तुझ्या वेधातच की रे सारी सुकले, सुकले
तुझ्या शोधातच डोळे थकले रे, कोमेजले

नाही संगतीला तू रे, आणू कोठून मी हसू?
कशी थांबवू काहिली? कसे थांबवू मी आसू?

राया, धावशील का रे माझ्या खुळीच्या मिठीत?
राया, नहाशील का रे, माझ्या झरत्या दिठीत?

# वेध-चांदणी

नितळ मनाच्या आकाशाला
सांज गुलाबी लज्जा शिवली,
तेव्हा माझी वेध-चांदणी
क्षितिजावरती तुझ्या उगवली

तसाच आलो अवचित दारी
अन मौनाची फीत उसवली
सोनस्मितांची अवघी दौलत
अधरातुन भोवती उधळली

पदर लपेटित नजर निथळली
आणि क्षणाला अंकुर फुटले,
स्वैर बटांनी सहज मोजले
मोहरल्या मनचे हिंदोळे

" मी आलो " चे उठले मोहळ
डसले रोमांचांनी मार्दव,
उत्कटतेच्या दवात भिजले—
आतुरल्या इच्छांचे आर्जव

अवघडलेली भेट साधता
निःश्वासांनी फडफडले क्षण,
मोहरल्या दवल्या मौनातुन—
अवचित गळले तृप्तीचे क्षण

## मृडानी

वर पाहशील तर आकाश झेपावेल
खाली पाहशील तर धरा निकट घेईल
मिटू पाहशील तर पापणीच धार्जिणी होईल
—उमलत्या मनोगतांना

मृडानी, आज गीत तुझे राहिलेले नाही

लज्जेच्या कळांनी आरक्त झालेली तू
हिमगौरा, आनंद-नंदिनी
अस्फुटशी अनंत गुलाबी स्मितं—
दाटीवाटी करतात निष्पापशा चेहऱ्यावर,
आणि अनावर भीड
उरात बुडून घेऊ पहात आहे
ठेवून जात आहे झेपावणारी नजर
पंखाचे हताशपण अपांग पापण्यासाठी

आणि एक-एकच निःश्वास
एक नादहीन लकेर होऊन
घेरून रहात आहे किती तरी वेळपर्यंत

## अश्विनी

थरथरती कमलकळी
भाव हळू उमलतसे,
दरवळुनी रंगकोष
वादळती गंधठसे

वेध घेत संथ खोल
रेखिव त्या नेत्रकडा,
हृदय दवे झेलुनिया
भरतीचा चिंब सडा

फक्त मौन तेवतसे
शांत, धवल, रोमांचित
अश्विनि ही अडखळते
स्वप्नांवर स्नेहांकित

तू येसी घेउनिया
गात्रांवर इंद्रधनु,
आज नव्या सौख्य-व्यथा
आज नवा दुःख-मनु

## मीलनोदय

सखि, मीलनोदयाची क्षितिजावर ये तारका
अंतरातील तिमिर होई पारखा, पोरका

अनोळखी, संकोचाचे होत विरल पटल
उत्कंठेची रक्तप्रभा व्यापी वेधाचे मंडल

अनामिक ओढ कुणी संदेहात मार्ग रेखी
तुझ्या-माझ्या निःश्वासांत आणि विरते काळोखी

तारकेच्या·स्पंदनाने आज मंथर हो वारे
पाकळ्यांच्या मोहनात भ्रमराची धाव सरे

मंदावल्या सरितांना सागराची हाक येई
अंकुरल्या धरतीला नभ कवेमधे घेई

टपोरला भावगंध, गुदमरलेले वारे
कांतीतून व्याकूळता भरे, मोहरे, पाझरे

प्राचीवरची तारका क्रमे आकाशाचा पथ
फक्त एक मध्यरात्र, फक्त एकच पहाट

# चंद्ररेखा

तुझ्या अंतराची ओढ, चांदण्याच्या आर्त धारा
तुझा स्पर्श ओलांडत माखमाखलेली धरा

चंद्ररेखे, विहरसी उजळत धराकाश
शांत प्रकाशाने चाले तुझ्या मंद मंद श्वास

कृश पांडुरली काया, वाणी सनईची धारा
सुखभारे निसासतो भवतीचा रानवारा

पापण्यांच्या कडांमधे थरारते व्याकूळता
तुडुंबताना पापणी भावभरे तुके माथा

अंतरीची चंद्रधारा उजळते नेत्रपाणी
काळ्याभोर डोळ्यांमधे बोले हृदयाची वाणी

तुझी ओढ माझ्याभोती प्रकाशाचा चूर ओती
तुझी मिठी, विरघळे त्यात तुझी-माझी माती

## स्पर्शलिपी

पापणीच्या तुझ्या धारा
माझी अनोळखी भिजे,
ओठ ओठाशी भिडता
दुःख मिठीमधे रुजे

थरथर रिचवीत
कासाविशी लागे झुरू,
गात्रे पाझरु लागती
तृप्ती झरे झुरमुरु

स्पर्श असा अधीर की
वेदनेचे मूळ दुखे,
निकटता उमलवी
जागोजाग सुख मुके

मोहरल्या देहावर
उमटत स्पर्शलिपी,
अक्षराच्याही अतीत
प्राण अक्षयता व्यापी

## रात उन्मत्त सुरंग

रात उन्मत्त सुरंग एकांताच्या कमलात
रोमरोम झंकारत तारकांची बरसात

निळया गर्द नीलिम्यात खिदळती लक्ष लाटा
गुदमरल्या गात्रांत मोहरल्या लक्ष वाटा

मूर्त होत मनोगत, हिंदकळे स्वर स्वर
नेत्र पापण्या मदिर, ओठ कंपित अधीर

सुखविकल रागिणी धरू पाहे परतीर
विरघळे निमिषात आणि सजणाचा धीर

सुंगधाच्या सरीवर हेलावत, एक होत
बेहोषीच्या भरतीने त्यांचे पुसले संचित

आकाशीच्या नक्षत्रांना प्रकाशाचा स्राव सुटे
गर्द निलीम्याला उटी, कमलाची दिठी मिटे

मात्र बरसत राही दिव्य परम संगीत
रात उन्मत्त सुरंग एकांताच्या कमलात

## चन्द्रधनु

पूर्ण चंद्रमा वाढवी
अधीरता सागराची,
हिंदकाळून फुटती
तुझ्या माझ्या भाववीचि

फेन फुलांचा घालते
वेडी व्याकूळता सडा,
ओल्या गंधात धुंदती
आणि किनाऱ्याच्या कडा

धुंद माखल्या वाऱ्यात
होऊनिया क्षण स्वार,
स्मृति बावऱ्या कापती
अवघडले अंतर

पुन्हा हळूच रेलते
धरेवर इंद्रधनु,
रंग चोचीत वेचाया—
आणि बिलगे पाखरू

## शरदयौवना

रात निळी काळी यमुना, वृंदावन शिखर नभाचे
उन्मत्त अधिरल्या श्यामा, नेत्रकडा दुथड्या काचे

चांदण्या थरारत आसू, काचोळी उसवे तंग
मदमंथर चंचल बाधा, आवरे न उतट अनंग

भरतीत अभोगी राधा, नच भान सांध्य वसनाचे
ही शरदयौवना वेडी तृणरोमांचात विराजे

नच तिला आज ऐकू ये ती कळ्या-फुलांची बोली
मोहरल्या, फुलल्या कुंजी ही आज एकटी झाली

तो दाह निवारू पाहे निःश्वास होउनी वारा
ओसंडे आर्त प्रतीक्षा होऊन चांदण्या धारा

आकाशी लहरे वारा, तो स्पर्श मोरपंखाचा
हो सुरू रास, ओठाशी गुदमरे सुखाची वाचा

आनंदधवल दीप्तीने प्राशतो जिवाचा घोर
क्षितिजावर ये घननीळ–मुगुटावर शोभे कोर

अन् श्यामा होती शुभ्रा, जणु धारा रजतरसाच्या
तृप्तीच्या सहस्त्र झरण्या लागती उरी राधेच्या

घननीळाही होई शुभ्र विरघळून त्यात निळाई
ही शरदमंगला रजनी तृप्तीची हो हिमराई

## लाज उमटली

लाज उमटली ओठांच्या काठानं
दोन्ही गाली खुले लाली!
मनी दाटू आल्या कुणा सुंदराची
दृष्टादृष्ट का ग झाली ?

दृष्ट तरळली पाकोळीच्यापरी
भरभरूनीया ऊर
जीवघेणी तऱ्हा त्याच्या वागण्याची
बदलला तुझा नूर

ओळखली का ग सूचित केलेली
हृदयामधली वाणी ?
खुणा निशाणीच्या रूपलेल्या देही
अंगाचे हो पाणी पाणी

मनात आलेले हवे तसे झाले—
तुवा पार केला तीर,
कणाकणांतून ओतू आलीस तू
नेत्री दाटले का नीर ?

## हरव

तुझ्या लालीशी आसक्त होत–
मी हरवत असतो

माथ्यावरचं आकाश
गमावत असतं माझी लगट
मातीपासून उपसून घेणारी.
मूक प्रतीक्षा नाही आड येत–
या उन्मत ओसंडण्याला

स्पर्शांच्या सवडीसाठी–
खळखळणारं दाट हसू
आवरून राहिलेलं असतं
ओठाच्या आडोशाला.
आणि रोमांचाची ओढणी
अवजड करीत, गात्रं
गुदमरू लागलेली असतात—
मीलनाच्या सोनझळांसाठी

# उदासी

उदास या सकाळीच
आळसली सारी जाग,
खडकाच्या माथ्यावर
धुके भरे जागोजाग

वाळलेल्या पानांतुन
घरघरे गार वारा,
खळखळत्या पाण्याला–
पायवाटेचा दरारा

पाखराच्या डोळ्यामधे
क्षितिजाला पेंग येई,
कणकण सुकू लागे
ओली दवलेली राई

सूर्य अजून धुक्यात
निळे नभ माथ्यावर,
सुखावल्या झाडामागे
फिका दिवसाचा चंद्र

## हाक

आठवून सारे, विसरूनही ते
पूर्वीचे, आपुले सगळे आगळे–

माझ्यासाठी पुन्हा थांबशील का रे
व्याकुळल्या नेत्री मावशील का रे ?

गात्रांत फुलले मदन-मार्दव
अंतर उमले, नेत्रांत आर्जव,
मोहरते ही मी तुझ्या दर्शनाने
प्रतीक्षा ओसंडे आर्त लोचनाने,

सौंदर्य माझे तुझ्या चरणाशी–
लोळू बघते, पाहशील का रे ?

ठाऊक न नित फुलल्या प्रीतीला
अहंतेने विखारली ही वंचना,
प्रीतीची उर्मि रोधता येईना–
दिशानीच आज घातले काजळ
ताऱ्यांच्याच नेत्री तुडुंबले जळ

मी मात्र ही अशी – जाणशील का रे ?

ओसंडे गात्रांचा गंधित बहार
अंतरी दाटला वेडा अभिसार,
धुंदावल्या दिशा तुझ्याच रूपांनी
अंगप्रत्यंगांत तुझीच निशाणी,

एकदाच घे हे यौवनाचे घडे
दिठीमिठीमधे रिचवून सारे

## जळवेडी

चंद्र निळा
माथ्यावर,
पायतळी
जललहरी

कलश रिता
कटीवरती,
भ्रान्त खुळी
जळवेडी

नेत्र-डोह
डबडबले,
हृदय रिते-
हो, ओठीं

थरथरत्या
ओठांवर–
मौनाची
घट्ट मिठी

## वसंत-वणवा

उशाउशांतून वसंत-वणवा
फुलाफुलांतून गंध-धुमारे,
रंगांच्या धडधडत्या ज्वाला
कोमल, नाजुक जळते सारे

व्यथा न त्याच्या नभ-निनादत्या
नच धडपड, तगमग सुटण्याची,
रसरसुनी कोळपे, काजळे
जळे विकल सोशीत हताशी

ही नियति, हे जीवन-संचित
मी झालो वणव्याची धरती,
जळू न शकतो मी वणव्यासह
कारण मी तर त्याची माती

# तो चाफा : ती सकाळ

१

तो चाफा : ती सकाळ
सोनमाळ

झुरझुर, थरथर
गुडमरणे गौर गुलाबी
घनटपोर

आषाढी नयन-मोर

आकाशी तेजचिंब
पापणिया

तो चाफा, ती सकाळ
अश्रूजाळ

२

घळघळ घळघळ
लपवू पाहे रिते रिकामे
सोस तिचा...

—फेसाळुन जाई
रण राही अर्ध-अनावृत

आकाशाशी झट घेणारी
तिची हताशी—
रित्या आकाशी

३

उजेड पोरका, रात्र पोरकी
मधे व्यथा मुकी

गळत नाहीत सोन्याचे कण
क्षणांचे वण

श्वास–
छे, निःश्वास...

मरण ही आसन्नमरण
अश्रुशिवाय, आवाजाशिवाय
जन्माला आलेले हे
ज ग णे

## एकएकला निःश्वास

एकएकला
निःश्वास—
देठहीन, ज्योतीसम

अंधार हा...

अवकाशी
पर्णहीन
कासाविशी

चांदण्याच्या ठिणग्यांनी
वाफारलेली
आसवे,

मुसमुस कोंदलेले
शुभ्र गुलाबांचे थवे

येता तू—
लपले नभ
शरद
निळ्या डोळ्यांतून

वर्षा
बुजवू बघते
ही—
उरली
एक खूण

## सुमित्रा : अेक अशक्यता

हेमंतावरली मुसमुसलेली उन्हं
सारं कसं मोहरून, दाटून आल्यासारखं
सावल्यासुद्धा थक्क झाल्या आहेत

ओठावरचं अंगशी आल्यासारखं

मौनालाही मुरगळणारे
देहातले रेंगाळणारे आवेग,
पापणी ओढून घेता घेता —
परदेशी झालेली भोवतीची छटा
फिक्कट, अंगभर, भुरभुरल्यासारखी

अवंढ्यांनी स्वतःलाच गिळून घ्यावं
असं सारं—
न सरणारं, न विसरणारं

निष्ठूरतेने जाणाऱ्या प्रवाश्या

तू जाणारच होतास
तर माझ्या दारात--
तुझी पावलं तरी, ती
का उमटवून गेलास ?

सुगंधानं मोहरलेली
ही जाईची वेल तुझी
वाट पाहून शिणून जाते
आणि तिची ती फुलं
गळून पडतात ती तुझ्या
उमटल्या पावलांवर

तू जाणारच होतास,
तर माझ्या उरात
आपली पावलं—
ती तरी का उमटवून गेलास ?...

# रातराणी

पायतळी उसळती तमकण
अवकाशी तांबुसली लाली
कोनांतून हेलावती विषादरेखा
काळ्या निळ्या

थंडगार धुळीमधे पहुडली वाट
एका कडेने, नीट
आकाशात अंधारले

तारांवर लागलेले विजेचे मोहळ
जांभुळल्या प्रकाशाची गळ
सारे निर्जन निर्जन

डांबरल्या रस्त्यावर ओरखडे शीळ
दूर धावणारी गाडी,
सारे काही गिळणारी भयाण शून्यता
अर्धे वर, अर्धे खाली

अर्धे वर, अर्धे खाली
खिडकीशी बिलगती रातराणी
अंतराचे पाणी पाणी

# परावा

नजरेपासून दुरावलेलं आकाश
लांब, अंतरावर
हिरव्यागार वनश्रीशी खेळणारे
खेळविणारे वारे,
विलक्षण स्तब्धतेनं हरवलेला
नजीकचा अवखळ लाडिकपणा

अंतःकरण मोहरवणारे पदन्यासहि
पुसट, अंधुक
ऐकू येईनासे होत आहेत
जणु माझं नव्हतंच कधी हे सारं

अंतःकरण अभिमुख राहूनच
हरवत असतं दुरावणारे दुवे
एकेक...एकेक
निःश्वासांच्या आवेगानं

आणि काळ धावतच असतो
स्वतःची चाल नि दिशा गमावून—
न थांबता आल्यानं

## पेंग

धरा-नभ तेवलेली
दुपारची प्रखरता,
धगधगलेली पेंग
सावरते कोसळता

मृगजळाच्या काठाशी
भास-झुरक्या नारळी,
हिरवळलेला शीण
क्षीण विकलता तळी

मना आलेला आवेग
स्तंभापरी पिंगा घाली,
विफलतेच्या वाळूत
फिके हसू, तेल गाळी

धरा-नभ तेवलेली
दुपारची प्रखरता,
धगधगणारी पेंग-
— कोसळते सावरता

# अंधार

रोजचीच ही संध्या फुलली
ती वळणे, ती स्मिते आजही,
संधिकाल सोन्याची दीप्ती
कणाकणांतून पेरत राही

सरावलेली झुळुक स्वतःशी
ओठंगुन अवघडते आहे,
कातरवेळी नभात कोणी
एक पाखरू फिरते आहे

फिरते आहे आज कालसे
ध्यास तयाला उरला नाही,
नेत्रातिल अंधार तयाच्या—
हवा तेवढा सरला नाही

## लाव

लोभस येते रात्र लावसट
चोरपावली कातरवेळी
आणि पसरते वृक्ष झऱ्यावर
ती जहरी जादूची जाळी

पेरत धावे कृष्ण काळिमा
कुरवाळी आळसल्या छाया,
अन फुलत्या वेली, वृक्षांच्या
काजळते मोहरल्या काया

गुदमरता पानापानांतुन
अमळ झाडे संचित होती,
फडफडल्या पंखांत उमटते
किलबिलुनी थरथरती भीती

अंगावरती उठे शहारा
गोपी हिरवी होइ बावरी,
क्षितिजावर विरणारी लाली
साठवताना गोरीमोरी

अगतिक होउन भक्ष्य बने ती
स्वप्न चिंबते व्यथेत भिजुनी,
गिळून अवंढा अन तृप्तीचा
लाव हसे लाखो नेत्रांनी

## छिनाल

काळोखाचा अथांग सागर
वारा विणतो काळे रेशिम.
सळसळणाऱ्या फांद्या करती
सुस्काऱ्यांची बेचव तालिम

आकाशाच्या गळ्यात अडली
लोचट भेदरलेली भीती
घाली एकांतास उखाणा:—
‘ कुठली प्रीती, कुठली माती ? ’

थबके वारा रेशिम विणता
सळसळ होते अमळ संचित,
एकांतातुन हळूच निसटे
चिवचिव नि फडफडाट, उत्तर

काळे रेशिम वाहू लागते
पुन्हा सुरू ती बेचव तालिम-
भीति पळते जीव घेउनी
सांडत मागे छद्मी लाघव

## विझलेला रत्नदीप

विझलेला रत्नदीप
ठिणगी मिणमिणती,
फडफडुनी पंख कुणी
तिमिर निवारू बघती

क्षितिजकडा दाटुन ये
धुरकटले अंतराळ,
धुमसुनी हो गप्प गप्प
अंतरीचा जाळ व्याळ

## उंबरा

उंबरा—
घर सावरायचा एक सोस

विस्कटून द्यायचं असतं ते
सामोरं होऊन येऊ नये म्हणून.
प्रत्येक सोसण्यामधे
एकेक भीती लपवायची असते
त्याच्या त्याच्या आधीची—
हसून, फुलत जगवलेली

नव्या नव्या सोसण्यात
विसरायचं असतं—
आतून कुठून तरी
उठून येत असलेलं सामोरं होणं–
प्राण ओलांडत

## आकसली घट्ट माती

आकसली घट्ट माती
काचकठोरले तळे,
व्याकुळल्या अंधाराचे
त्याच्यावर दाट जाळे

खोल खुपल्या पाण्याची
खोली मोजू, मोजवेना
कालवलेला काळोख
निवळता निवळेना

पाने फुले काजळून
होई वेलींचे जंजाळ
सोडू पाहे, सोडवेना
मुळी लागेनाही तळ

अंतरात उसासती
उष्ण उमलून कोंभ,
मृगनयनांमधून—
कधी ठिबकता थेंब

## बकुलरात्र

जाशिल का घेउन बकुल फुलांच्या माला ?
गुंफता गुंफता अर्ध्या ओल्या झाल्या

अन घडली केवळ एक स्वप्नशी कहाणी
ज्या साक्षी अजुनी मूक नेत्रीचे पाणी

का गंध फुलांना इतका चिर सलणारा ?
का जिवा कापतो झोंबुन वेडा वारा ?

तव म्लान मुखापरी सुकली फुले बिचारी
तो विकल गंध, छे, श्वास तुझे अवधारी

सरलेल्या संध्या, आता केवळ रात्री
चांदण्या रुताव्या आता उरी वा नेत्री

कधी अंधाराची व्हावी मजवर माया
मी तुझी जाहलो केवळ जळती छाया

## एकाकिनी

ती वणावणा फिरत असते
सदाचेच रिकामपण बरोबर घेऊन

आठवणी दुरून पहात असतात
ते पोरकं केविलवाणेपण.
निराधार झालेले वेध
हेलकावे देत असतात
आदि अंत गमावलेल्या अनेक मध्यांमधून

विषण्ण पराजित झालेली नजर
विस्कटलेल्या स्मितांचा आडोसा करू पहाते
अपुऱ्या दुःखातच, हुंदका—
फुटून घेण्याची दीर्घ धडपड करीत असतो.
अवचित डसत असतात ओठांमधे कंपनं
हताश होतात पाहून
नजरेची विस्मयजनक कोसळण
सारीच घसरड अपरिचितापर्यंतची

दरीतला अंधार—
हरवून राहिलेला असतो
गर्द अंधाराची दाट निश्चितता
आणि अधु झालेला क्षण
अगतिकपणात रिचवत असतो
सरतानाची एकाकी धग

# चिरचैत्र

आणि उद्या उजडेल शेवटी
फुलेल तरीही चैत्रपालवी,
तेवतील त्या अनंत ज्योती
हट्टाने जरी कुणी मालवी

वेडा वारा माळत राहिल
फेनफुलांनी स्वप्नकिनारा,
व्याकूळ मन भिरभिरते राहिल
जरी लाभला त्यास निवारा

हृदी उमलती भाव निरामय
अनंत फुलती, विरत तेवती
या भावांना साठवणारे—
शब्द कोठले माझ्या गाठी ?

## आणिक जळतो पारिजात

आणिक जळतो पारिजात नित
वठला जरी अंगांगावरती,
कातर पाने, फुले सुगंधित
गर्दी करती खांद्यावरती

हसती त्याला झाडे झुडुपे
पाहुन वेली वळवत माना,
आणि काढते कुणी साळुंकी
म्हाताऱ्या चिंचेवर ताना

पायाशी कुरबुरते हिरवळ
थरथरते खरक्या स्पर्शाने,
येती अन जाती माघारी
वाऱ्यावरली कुणी विमाने

परी न सुरकुती याच्यावरती
वठल्या अंगी फुटतो, फुलतो
नखरेली कुणी झुळूक येता
अन् पुष्पांची चूळ फेकतो

# व्याकूळ पाणी

गाली लपवीत संध्येचा राग
डोळ्यांनी रोखीत अधीऱ्या नजरा
कोनाकोनांतून आसुसलेल्या
—रोजशी जातेस

उगा सावरीत प्रीतीचे पाखरू
पदराखाली, नावरे तरीही
आवर घालता ती फडफड
—पापण्या-पंखांची

उगाच मानेला अस्फुट लचक
कापऱ्या हाताने लोटीत मागे—
लोचट शेपटा फिदा झालेला,
हातात धरून पदरटोक
मनच्या मनी मारीत मिटक्या
जासी लगबग—
पायाने ठेचीत वादळी वारा
—उन्मत्त झालेला

शुभ्र ढगासम धवल वसन
शुष्क आहे का अंतर तुझे
त्या ढगासम ? श्रावक, छचोर ?
पण कधी का ग, कधी का दिसे–
कातरवेळी शिणल्या डोळी
व्याकूळ पाणी ?

## वाटचाल

अंधारली रात सारी, आकाशात नाही तारा
क्षितिजाच्या कुशीमधे चाळवतो रानवारा

पसरले वाळवंट दिशादिशांना गिळीत
मृगजळही न दिसे, नाही सोबत, संगत

हातातल्या दीपापरी भडकते वेडे मन
धावे दूर कडावर, घेई पायांत लोळण

पाय धावती पुढती, मार्ग विरला तमात
भरे दिशांत नि विरे भांबावलेला एकांत

नाही वाट नाही दिशा, आशा सुसाट धावते
नाही पुढे मागे कोणी, वरी आकाश फाटते

खिन्न दृष्टीस पेलेना काळवंडला पसारा
पदे बेफाम धावती आवरीत प्रांत सारा

दिसे कुणी मुशाफिर धावताना तिमिरात-
डोंब आगीचा पेटला हातात नि अंतरात

# अरण्यरुदन

सागरातील वणव्याच्या धगधगत्या ज्वाला
क्षितिज तप्त जाळू बघती चुंबूनी नभाला

धडधडुनी कोळपलेली स्थिरचर वनराई
भेगाळुन धापे धरणी उष्ण श्वास टाकी

विव्हळती नीरव रात्री, साहवे न दाह
अंतरी फुटुन चंडांशु उष्ण झळा ओती.

कोळसे निखारे यांनी खचलेली माती
सांगाडे वृक्ष तरूंचे, भकासले उदधी

राखेच्या लोटांचे ते उमाळे, उसासे
दग्ध पंख, अस्थी तळच्या, क्षुण्ण क्लांत विश्व

यामधून विव्हळू पाहे मरणारा वारा—
एक जीव तोहि जखमी शोधतो निवारा

## महाप्रयाण

पाखरू अजाण वृक्षाच्या फांदीला
सावरू पाहते जीवनाचा झोला

दृष्टीच्या टप्प्यात मावेना साकार
वृक्षाचा सगळा विस्तार, संभार

वणवे वादळे आकाशी घेरता
कोटरी कोटरी भडके अहंता

पाखरास फांदी पायांत येईना
उठले चीत्कार कोटरामधले-
कानात मावेना

वृक्ष रुतलेला अंतरामधे
महाप्रयाणाचे सुटलेले वारे

शांत होतील वाहता वाहता
नवजीवन आणिक सांडेल
कोटरामधल्या चोचीचोचीसाठी

संपली कथा

निळे भरून—
आकाश

क्षितिजाशी
पहुडली नगरेखा

चित्रावली
राने सारी

खिडकीचा कवडसा
—असा तसा

## झाड

उभे इथे हे झाड वाळले
जणु सांगाडा मृत देहाचा—
उरला, सरल्यावरही येथे
हल्ला गिधाड अन घारींचा

जणु सुकल्या या जीवन-आशा
गळुन अकाली सुकुनी गेल्या,
शिणलेल्या अन दीर्घ प्रतीक्षा
अंध बनुन या अवघ्या उरल्या

सू सू करुनी यातून वाहे
वसंतातला अजुनी वारा,
फुलली झाडे सोडुन यावर
पक्षि एकला घेइ निवारा

पायाशी घे लोळण हिरवळ
नुटे सुरकुती पळभर देही,
सर वर्षेची वा चंद्राची
याला तिळभर भिजवत नाही

स्वप्न हेच का कुणी गोठले-
व्यवहाराच्या शिशीरवृष्टीने ?
का दैवाची दृष्ट लागली—
मोहरताना कणाकणाने ?

याच उरी परी घुसले होते
अनुरागाचे ते अमोघ शर,
याच उरी अन फुटला होता—
समृद्धीचा अथांग सागर

## माणसं

माणसं—
मरत असतात
शेवटी थोडी जास्त तडफड होते

पण सारंच संपून जातं
अगांतुकपणानं, अगतिकपणानं, आनंदानं
केलेल्या साऱ्या कृती—
त्या कृतींच्या स्मृती–नाही नाहीशा होतात
त्याचं अस्तित्वही नाहीसं होतं

आठवणींचा गुंता करणाऱ्यांचं—
खारं पाणी, कधीच चुकत नाही
अर्थहीन आक्रोश, ते हुंदके, ते गप्प गप्प होणं
–नाही झाकू शकत त्याचं हताश रिकामं होणं
धड अंगभर

नुसत्या वस्तु रहात असतात.
त्यांना गुंता करता येत नाही
जास्त तडफडही करता येत नाही–
मग गप्प गप्प व्हायला तरी कुठून जमायला !

माणसं मरत असतात–
–नुसत्या वस्तु रहात असतात

काय लिहू ?
लिहवेना
आज अक्षरांची माला

भावनेची राख उरे
आग झाली—
सांगण्याला

खुळावती डोळे माझे
वेध घेती
गेले दिन

मृगजळही–
न दिसे,
जळवेडा झालो मीन

जळवेडा झालो मीन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. 98626

# काललीला

आज नवी संवेदना
स्पर्श जिचा केवड्या-नागिणीपरी
सुगंधाने माखलेले हलाहल भिने उरी

आज नवी संवेदना
हृदी शिरे अवचित ओठंगुन
वर स्मिताची ओढणी, आत लावण्याचे ऊन

आज नवी संवेदना
नवे रूप, नवे वेड, नवे ध्यान
फुले डोळ्यांतला पारा, त्याची दिवाणी तहान

आज नवी संवेदना
नव्या घाटाचा चषक फेसाळला
नवा डंख ओठांवर उबारला, उधाणला

आज नवी संवेदना
तुझ्या माझ्या नयनांत अश्रू मुके
मिठी आगीची घालसी साहण्याला दाट धुके

प्रा. गोविंद जोशी यांचा पहिला कवितासंग्रह

# गंधरात्र

[ प्रस्तावना : कवी कुसुमाग्रज ]

## काही निवडक अभिप्राय

* * *

आपली शब्दकळा अत्यंत आकर्षक आहे. आपल्या संग्रहाला कुसुमाग्रजांनी प्रस्तावना लिहावी, याला अर्थ आहे.

– वा. ल. कुलकर्णी

आपल्या पुष्कळ कविता आवडल्या. आपल्या कवितांसंबंधी मला जे म्हणावयाचे आहे, ते सर्व, कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी आधीच म्हणून ठेवले आहे.

– अनिल

आपला 'गंधरात्र' कवितासंग्रह मला फार आवडला. त्यातला भावनांचा आवेग मला विशेष जाणवला.

– अनंत काणेकर

काव्यलेखनाजोगी प्रतिभा असणे हे देवाघरचे देणे. क्वचितच कुणाला लाभते. कवी गोविंद जोशींना ते लाभले आहे. त्यांच्या काव्यात विलक्षण वेग व विस्मयकारी झेप आहे.

– गो. नी. दांडेकर

कविता ही वीज आहे, तिला धरू पहाणाऱ्या शंभरांपैकी नव्व्याण्णवांना ती दग्ध करते. एखाद्याचीच ती दासी होते, अशा अर्थाचे केशवसुतांनी एका पत्रात उद्गार काढले आहेत.

कवितेच्या नादाने वेडावून जाणाऱ्या शंभरांत, यशस्वी होणारा जो एखादा अपवादात्मक कवी असतो, त्याच्या मार्गाने प्रा. गोविंद जोशी यांची पावले पडत आहेत. कुसुमाग्रजांसारख्या प्रतिभाशाली कवींनी त्यांना आशीर्वाद देताना, त्यांच्या ज्या कवितांचा उल्लेख केला आहे, तेवढ्याच कविता एखाद्याने वाचल्या तरी या कवीच्या कर्तृत्वाची त्याला कल्पना येईल.

– वि. स. खांडेकर

तुमच्या वाङ्मयीन जीवनाचा भविष्यकाल फार उज्ज्वल आहे. संगमरवरातून उत्तम मूर्ती निघाली आहे. ती सर्वांचे आराध्यदैवत होवो !

– गिरीश

प्रा. गोविंद जोशी यांचा ' गंधरात्र ' हा कवितासंग्रह म्हणजे एका भावसंपन्न जीवनप्रेमी मनाच्या आर्त स्पंदनांचा आलेख आहे. भोवतालच्या कोलाहलातही, स्वतःमधला कलावंत जागा ठेवू पहाणाऱ्या आणि त्या दिशेने वाटचाल करताना येणाऱ्या विविध गूढनिगूढ अनुभवांनी प्राप्त होणारे दुःख-भोग सहन करणाऱ्या, जीवनोपासकाची कहाणी, येथील शब्दाशब्दांतून साकार झाली आहे.

अंतःकरणातील जीवनझऱ्यालाच लागलेली, कुठल्यातरी ' उदात्त पाण्याची तहान ' श्री. जोशी समर्थतेने व्यक्त करतात. श्री. जोशी यांची मृदु, मुलायम, कातर शब्दांचे लेणे लेवून अवतरणारी प्रेम कविताही रसिकांच्या अंतर्मनाला सहज भिडण्याइतकी उत्स्फूर्त व उत्कट आहे.

– वि. म. कुलकर्णी

कवीच्या विराण्यांत व्यथा असली तरी त्यांना एक अपूर्व समाधानाची पार्श्वभूमी आहे. श्री. गोविंद जोशी हे खरे प्रतिभावंत असून, त्यांच्या प्रज्ञेने त्यांना अचूक मार्ग दाखवला आहे. त्यांची कविता आर्त, विविध कल्पनांतून वावरणारी व आपल्या विषयाला सरळ भिडणारी आहे.

– केसरी

आत्माविष्काराची धडपड हे या संग्रहातील कवितांचे एक वैशिष्ट्य जाणवते.

– सकाळ

'गंधरात्र' काव्यसंग्रह चाळल्यावर पहिल्या प्रथम कोणती गोष्ट लक्षात येत असेल तर, कवीच्या प्रणयोत्कट आणि अत्यंत काव्यात्मक मनोवृत्ती. कवीच्या काव्यरचनेच्यापेक्षाही ही मनोवृत्तीच अधिक छाप पाडते. कवीच्या काव्यातून होणाऱ्या प्रेमपूजनाचे कौतुक वाटते हे निश्चित.

– मराठा

श्री. गोविंद जोशी यांच्या मनोवृत्तीला अजून मधुवयातील आत्यंतिक हळवेपणाचे वेड आहे. 'जगतो मी जीवन हे शब्दाच्या कायेने' अशी काव्याबद्दलची उत्कटता, त्यांच्या अंतःकरणाला भारून राहिली आहे. आपल्या शब्दांनी आपले भावगंध झेलावेत असे त्यांना तीव्रतेने वाटते. त्यांच्या शब्दांनी अनेक ठिकाणी हे परिणामकारकपणे केले आहे.

– महाराष्ट्र साहित्य-पत्रिका

'अश्रूंनी डबडबलेल्या दृष्टीने', परंतु बऱ्याच अलिप्तपणाने श्री. गोविंद जोशी जीवनातील अनुभव घेऊ शकतात. त्याचप्रमाणे पूर्वपरंपरा संपूर्ण नाही तरी अल्पांशाने का होईना झुगारून, स्वतःची वेगळी वाट चोखाळण्यात, त्यांना यश आले आहे.

– मनोहर

कुसुमाग्रजांनी निवेदनात प्रा. जोशी यांच्या कवितेचे योग्य निदान केले आहे.

– लोकसत्ता

कवीला लागणारी कल्पकता, भाषाप्रभुत्व, भावनांची उत्कटता व हृदयाची आर्तता श्री. गोविंद जोशी यांच्याजवळ विपुल प्रमाणात आहे. कवीच्या ठिकाणी वसणारी आंतरिक जीवनाची खळबळ व अशांती त्यांच्याजवळ भरपूर आहे व कलात्मकताही ओतप्रोत भरलेली आहे.

– तरुण भारत

REFBK-0014828
REFBK-0014828

२४६२४